## - :: ऋणनिर्देश :: -

'महिला सक्षमीकरण' या विषयाला आज जागतिक स्तरावर आणि राष्ट्रीय स्तरावर खूप महत्व प्राप्त झाले असून सरकार महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक धोरणे, कार्यक्रम तसेच योजना आखून त्यांची अंमलबजावणी आपल्या प्रशासन यंत्रणेद्वारे करतांना दिसून येते. याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी मागील अनेक वर्षापासून भारत सरकार करीत आहे, त्याचा लाभ देशातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लाखो महिलांना मिळालेला आहे. अशा महिलांनी या लाभाच्या माध्यमातून स्वतःच्या व स्वतःबरोबरच आपल्या कुटुंबाच्या सक्षमीकरणास चालना दिली आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक उत्पादनात बदल (वृध्दी) झाला आहे. आज समाजात या महिला वर्गाला मान, सन्मान व प्रतिष्ठा मिळत असून त्यांचा राजकीय सहभागही वाढला आहे. या सर्व बाबींचा जर सकारात्मक विचार केला तर हा एक संशोधनाचा विषय ठरु शकतो, यावर आपले एकमत होऊन **"महाराष्ट्रातील ग्रामीण विकासात दारिद्र्य निर्मूलन योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण : एक चिकीत्सक प्रशासकीय अभ्यास - औरंगाबाद जिल्हा विशेष संदर्भ"** असा संशोधन विषय निश्चीत झाला.

संशोधन विषयाची चौकट निश्चीत करण्यापासून शोध प्रबंध पूर्णत्वास येईपर्यंत ज्यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले, ते माझे **गुरुवर्य व मार्गदर्शक आदरणीय प्राचार्य डॉ. वसंत सानप सर, बलभीम महाविद्यालय, बीड,** यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करतो. त्याचबरोबर मागील पाच सहा वर्षापासून आम्हा विद्यार्थ्यांना ज्यांनी 'केल्याने होत आहे रे । आधि केलेची पाहिजे।' अशी शिकवण देऊन संशोधनाची गोडी निर्माण केली ते **गुरुवर्य आदरणीय डॉ. एम.सी. पवार सर, प्रपाठक, लोकप्रशासन विभाग, डॉ.बा.आं.म.विद्यापीठ,** औरंगाबाद यांच्याही ऋणातच राहणे मी पसंत करेन.

प्रस्तुत संशोधन पूर्णत्वास जाण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील लोकप्रशासन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. प्रतिभा पाटील, तसेच डॉ. सांडू शिरसाठ, डॉ. सतीष दांडगे, डॉ. नंदकुमार नाईक, डॉ. प्रतिभा उन्हाळे, प्रा. ज्योती धायगुडे व राज्यशास्त्र विभागातील डॉ. बी.एस. वाघमारे यांचे मार्गदर्शन संशोधन चिंतनात्मक होण्यासाठी पथदर्शी ठरले आहे. या संशोधनात डॉ. पिंपळे, डॉ. कालीदास भांगे, डॉ. गजानन मुधोळकर, डॉ. सुरेश मैंद, डॉ. बालाजी

मैद, डॉ. संतोष बोडखे, डॉ. पठाण सर, डॉ. भरत मिमरोट, डॉ. संभाजी मराठे, डॉ. शिवसांब भुईनवाड, प्रा. सिध्देश्वर मुंडे, प्रा. सौ. बुरांडे, प्रा. मुंगे सर, प्रा. सांगळे, प्रा. गुंडे, प्रा. कु. कांगणे, यांच्या सूचनांचाही यथोचित आदर केला आहे.

या संशोधन काळादरम्यान कुलस्वामीनी शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. दापके सर, (आर.पी. कॉलेज, उस्मानाबाद), संस्थेचे सदस्य डॉ. सचिन दापके, तसेच बिल गेट्स कॉम्प्युटर आणि व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य रझवी सर यांचे प्रोत्साहन उत्साहवर्धक ठरले. ज्यांच्या सहकार्यामुळे संशोधन कार्यात गती प्राप्त झाली ते जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, औरंगाबाद येथील सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री ज्ञानोबा चाटे, अन्वेषक देशपांडे साहेब, श्रीमती खोतकर, त्याचबरोबर स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, नागेश्वरवाडी, औरंगाबाद येथील ग्रंथपाल श्रीमती आशा जोशी व सहा. ग्रंथपाल कु. सोनाली दैठणकर यांनीही मूळ संदर्भग्रंथ उपलब्ध करुन दिले त्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

हा शोधप्रबंध तयार करतांना मला सतत प्रेरणा व प्रोत्साहन देणारे माझे वडील श्री. इंद्रशेखर नारायणराव गित्ते, आई सौ. रुख्मीणीबाई इंद्रशेखर गित्ते, माझी धर्मपत्नी सौ. अंजली गित्ते, लहान बहीण मंदाकिनी गित्ते भाऊ पवनकुमार गित्ते, तसेच संशोधन काळादरम्यान मी वेळ देऊ न शकलो व काही काळ दुरावा निर्माण झाल्याने जो त्रास सहन करावा लागला ती माझी मुलगी 'अमृता' या सर्वांचे ऋण मी शब्दात व्यक्त करु शकत नाही, त्यामुळे त्यांचा मी आयुष्यभर ऋणी राहू इच्छितो.

शेवटी शोधप्रबंध सुबक व आकर्षक बनविणारे 'गिरिजा डेस्कटॉप पब्लीशर्सचे' संचालक श्री. विजय नागरे व आमचे विद्यार्थी माधव नागरे, फुलंब्रीकर यांनी कमीत कमी कालावधीत व कसलीही चूक न ठेवता योग्य काम केल्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. तसेच संशोधन कार्यासाठी निवड केलेल्या औरंगाबाद जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील महिला लाभधारकांनी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे. त्याचबरोबर मला या कार्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणारे इतर कुटुंबिय, नातेवाईक, आप्तेष्ट, हितचिंतक, प्रियजन व सहकारी मित्र यांचीही साथ मोलाची ठरल्यामुळे त्यांचाही मी ऋणी आहे.

...... धन्यवाद.

गित्ते चंद्रशेखर इंद्रशेखर